# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

Aurangabad - 431 004. Maharashtra (India)

NAAC 'A' Grade

# NATIONAL SERVICE SCHEME

Not Me But You

Dr. Rajesh Karpe (M.A. SET. Ph. D.)
Programme Co-ordinator
Mobile : 8275092478

Ref. No. NSS/ 501 Date : १८/५/२०१६

**प्रति,**
**मा. प्राचार्य/ कार्यक्रमाधिकारी,**
**राष्ट्रीय सेवा योजना सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद.**

**विषय:- राजातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दि. १६ ते ३१ मे २०१६ या कालावधीत स्वच्छता पंधरवाडा राबविण्याबाबत.**

**संदर्भ क्र:- महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराट्र राज्ये पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/दहशतवाद दिवस/ शापरिपत्रक २०१६/प्रशा-३ /६२६९ दि. १८/५/२०१६**

माहोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास विनंती करण्यात येते की, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराट्र राज्ये पुणे यांच्या पत्रानुसार केंद्र शासनामार्फत संपूर्ण देशात स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान नागरी राबविण्यात येत आहे.

केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियानाचा एक भाग म्हणून सर्व शासकीय व इमारतीमध्ये दि.१६ ते ३१ मे २०१६ या कालावधीत स्वच्छता पंधरवाडा खालील ठिकाणी राबाविण्यात यावा.

१. शासकीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सामुहिकरित्या स्वच्छतेची शपथ घेणे.
२. शासकीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी बसत असलेल्या ठिकाणाचा परिसर
३. शासकीय कार्यालयातील कागदपत्रांचे निंदणीकरण करुन व्यवस्थित ठेवणे व अनावश्यक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे.
४. शासकीय इमारतीचा परिसर स्वच्छ करणे.
५. शासकीय कार्यालयांमधील स्वच्छतागृहांची स्वच्छता करुन घेणे,
६. महाविद्यालय, परिसर स्वच्छता करणे. इत्यादी परिसर स्वच्छता करणे.

तरी आपण स्वच्छता केलेल्या परिसराचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विभागात लवकरात-लवकर पाठविण्यात यावा.

कार्यक्रम समन्वयक

सोबत : १. शासनाचे पत्र

**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय(उच्चशिक्षण)**

**महाराष्ट्र राज्यमध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.**

कार्यालयाचे संकेतस्थळ wwwdhepune.gov.in कार्यालयीन मेल-prash.dhepune@nic.in

फोन न. ०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं-०२०/२६११११५३/२६०५१७२९

क्र. उशिसं/स्वमअ/शापरिपत्रक/२०१६/प्रशा-३ /६२६९ दिनांक- १८/५/२०१६.

18 MAY 2016

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, (उ.शि) महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

**विषय- राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दि. १६ ते ३१ मे २०१६ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा राबविण्याबाबत.**

संदर्भ- नगरविकासविभाग, परिपत्रक क्र. स्वमअ-२०१६/सं.क्र.३४९/नवि-३४ दि. १६ मे २०१६.

केंद्र शासनामार्फत संपूर्ण देशात स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्यात येत आहे.

केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियानाचा एक भाग म्हणून सर्व शासकीय कार्यालये व इमारतीमध्ये दि.१६ ते ३१ मे २०१६ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा राबविण्याबाबतच्या सूचना संदर्भीय पत्रान्वये दिल्या आहेत.

सदर शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संस्था महाविद्यालये यांना कळविण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(हरिभाऊ शिंदे)
वरिष्ट प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रत-संचालनालयातील सर्व शाखा प्रमुख

२/- शासन परिपत्रकात नमूद कार्यवाही आपापल्या शाखेतील कर्मचा-यांकडून विहित कालावधीत करुन घेण्यात यावी.

राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये
दिनांक १६ ते ३१ मे, २०१६ या कालावधीत
स्वच्छता पंधरवडा राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:- स्वमअ- २०१६/ सं.क्र.३४९/नवि-३४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १६ मे, २०१६.

संदर्भ:- केंद्र शासनाचे पत्र क्र. D.O. No.२५/८/२०१६-SBM-II, दिनांक- १० मे, २०१६

श्री. केणले
CJ
17/5/16

शासन परिपत्रक -

केंद्र शासनामार्फत संपूर्ण देशात स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्यात येत आहे.

०२. केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियानाचा एक भाग म्हणून सर्व शासकीय कार्यालये व इमारतीमध्ये दिनांक १६ ते ३१ मे, २०१६ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा राबविण्याबाबतच्या सूचना संदर्भीय पत्रान्वये दिल्या आहेत. (सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे) त्या अनुषंगाने राज्यातही दिनांक १६ ते ३१ मे, २०१६ या कालावधीत सर्व शासकीय इमारती व कार्यालयांमध्ये स्वच्छता पंधरवडा राबविण्यात यावा.

०३. या पंधरवड्याच्या कालावधीत शासकीय इमारत व कार्यालयात स्वच्छता राखण्याबाबत दररोज विविध उपक्रम हाती घेण्यात यावेत, जसे-

(१) शासकीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सामुहिकरित्या स्वच्छतेची शपथ घेणे.

(२) शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी बसत असलेल्या ठिकाणाचा परिसर स्वच्छ करणे

(३) शासकीय कार्यालयातील कागदपत्रांचे निंदणीकरण करून व्यवस्थित ठेवणे व अनावश्यक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे.

(४) शासकीय इमारत व इमारतीचा परिसर स्वच्छ करणे.

(५) शासकीय कार्यालयांमधील स्वच्छतागृहांची स्वच्छता करून घेणे, इत्यादी.

०४. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या आधिपत्याखालील सर्व कार्यालयांना स्वच्छता पंधरवडा राबविण्याबाबत आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात.

०५. राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/ नगरपंचायती कार्यालयात तसेच नगर विकास प्राधिकरणांच्या कार्यालयातही उपरोक्त नमूद कालावधीत स्वच्छता पंधरवडा राबविण्यात यावा.

०६. उपरोक्त प्रमाणे सर्व कार्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती director.smau@gmail.com या ई मेलवर पाठविण्यात यावी. तसेच, या अभियानाच्या अंमलबजावणी संदर्भातील काही निवडक छायाचित्रे swachhbharaturban.gov.in या वेब पोर्टल वर अपलोड करण्यात यावीत.

०७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०५१६१६५२५१०५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सुधाकर झा. बोबडे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव.( सर्व)
४. मा. राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव (सर्व).
५. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग (सर्व), मुंबई.
७. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे मुंबई.
८. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
९. महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था.
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
१२. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, सदर, नागपूर
१३. सर्व विभागीय आयुक्त.
१४. सर्व जिल्हाधिकारी.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नव नगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे.
१६. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१७. आयुक्त, सर्व महानगरपालिका.
१८. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/ नगर पंचायती.
१९. निवडनस्ती (नवि-३४).